प्रेसनोट दि.०१/०४/२०१९

दि.३१/०३/२०१९ रोजी, सेवानिवृत्त झालेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा निरोप समारंभ व पोलीस दलामध्ये पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांच्या सत्कार समारंभ मा.डॉ.के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे अध्यक्षतेखाली शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथे दि.०१/०४/२०१९ रोजी संध्याकाळी ०५.०० ते ०७.०० या वेळेत पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती गोरे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय यांनी केले. कार्यक्रमास श्री.शिवाजी बोडखे, पोलीस सह आयुक्त,श्री.रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग व श्री.सुनिल फुलारी, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग, पोलीस उप आयुक्त,श्री. बच्चनसिंग, श्री. प्रसाद अक्कानवरु, श्री.पंकज देशमुख,श्री.संभाजी कदम,श्री.प्रकाश गायकवाड तसेच पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेले १९ अधिकारी व कर्मचारी,त्यांचे नातेवाईक, पोलीस नाईक ते पोलीस हवालदार व पोलीस शिपाई ते पोलीस नाईक या पदावर पदोन्नती मिळालेले सुमारे ८० कर्मचारी उपस्थित होते. सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थीत होते त्यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमामध्ये पुणे शहर पोलीस दलाचे इतिहासात पहिल्यांदाच मा.डॉ.के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी व उपस्थित वरिष्ठ अधिकारी यांनी पदोन्नती प्राप्त कर्मचा-यांना स्वतः पोलीस हवालदार व पोलीस नाईक पदाची फित गणवेशावर लावून कर्मचा-यांचे मनोबल वाढविले. मा. डॉ.के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाबाबत सर्व अधिकरी कर्मचारी यांनी मा.पोलीस आयुक्त यांच्या अनोख्या संकल्पनेचे स्वागत करुन समाधान व्यक्त केले.पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ श्री.प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

(कल्याणराव विधाते)
सहायक पोलीस आयुक्त,
मानव संसाधन विभाग,पुणे शहर.


पोलीसआयुक्तालय




पोलीसआयुक्तालय
पुणेशहर